
आधुनिक विचारांचे
# वर्तमान

बीड । मंगळवार, १५ फेब्रुवारी २०२२ । वर्ष : ४ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : १५ । पाने : ४ । मूल्य २ ₹



### हमारे बजाज नहीं रहे!

पुणे : ज्येष्ठ उद्योजक आणि बजाज समूहाचे दिशादर्शक राहुल बजाज यांचे शनिवारी निधन झाले. ते ८३ वर्षाचे होते. पाच दशकांमध्ये बजाज समूहाला नावारूपाला आणण्यात राहुल बजाज यांनी प्रचंड योगदान दिले आहे. पाच दशकांपासून त्यांनी बजाज ऑटोची धूरा यशस्वीरित्या सांभाळली होती.

# जयसिंह सोळंके ठरले किंगमेकर

## वडवणी नगराध्यक्षापदी वंदनाताई जगताप; उपाध्यक्षपदी बन्सी मुंडे



प्रतिनिधी

वडवणी : अगदी अपेक्षितपणे वडवणी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदी वंदना शेषेराव जगताप यांची निवड झाली. तर उपनगराध्यक्षपदी बन्शीधर मुंडे यांची वर्णी लागली. वडवणी नगरपंचायतीची निवडणूक अतिशय अटीतटीची पार पडली. भाजपा विरूद्ध राष्ट्रवादी असा दुरंगी सामना रंगला. या रणधुमाळीत राष्ट्रवादीचे झंझावाती नेतृत्व तथा बीड जिल्हा परिषदेचे सभापती जयसिंह सोळंके यांनी या निवडणुकीचे शिवधनुष्य खांद्यावर घेतले आणि लिलया पेलले सुध्दा किंगमेकरची भूमिका जयसिंह सोळंके यांनी पार पाडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे.



वडवणी नगरपंचायतीत सुरूवातीपासून चुरशीची निवडणूक झाली. नगरध्यक्ष पदासाठी चुरस होईल, अशी शक्यता होती. परंतु निवडीच्या वेळी भाजपचे आठ सदस्य गैरहजर राहिल्याने राष्ट्रवादी काँग्रेस–आघाडीच्या वंदना शेषराव जगताप यांची नगराध्यक्षपदी निवड झाली. तर उपनगराध्यक्षपदी बन्शीधर मुंडे यांची बिनविरोध निवड झाली. येथे राष्ट्रवादीचे आमदार प्रकाश सोळंके, माजी आमदार केशवराव आंधळे गटाने सत्ता मिळविली आहे.

तर आष्टी, पाटोदा, शिरूर कासारमध्ये भाजपने एकहाती सत्ता मिळवत नगरपंचायतीवर झेंडा फडकावला आहे. तर वडवणीत राष्ट्रवादी काँग्रेस–आघाडी, केजमध्ये जनविकास परिवर्तन आघाडी–काँग्रेसने युती करुन सत्ता मिळविली आहे. सोमवारी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्षपदासाठी निवड पार पडली. आष्टी, पाटोदा, केजमध्ये नगराध्यक्षपदासाठी एकच अर्ज दाखल झाल्याने येथे नगराध्यक्ष निवड बिनविरोध होणार हे नक्की होते. आष्टी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदी भाजपच्या पल्लवी स्वप्नील धोंडे तर उपनगराध्यक्षपदी शैलेश सहस्त्रबुध्दे यांची बिनविरोध निवड झाली.



### पाटोद्यात महिलाराज; नगराध्यक्षपदी सय्यद खातीजाबी

पाटोदा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदी भाजपच्या सय्यद खातीजाबी सय्यद अमर तर उपनगराध्यक्षपदी शरद बामदळे यांची बिनविरोध निवड झाली. शिरूर कासार नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदी भाजपच्या प्रतिभा रोहिदास गाडेकर तर उपनगराध्यक्षपदी श्वेता प्रकाश देसरडा यांची निवड झाली. आष्टी, पाटोदा, शिरूरमध्ये भाजपच्या नेत्या पंकजा मुंडे, खासदार डॉ.प्रितम मुंडे, आमदार सुरेश धस यांच्या नेतृत्वाखालील गटाने एकहाती सत्ता मिळविली आहे.

### केजच्या नगराध्यक्षपदी सिताबाई बनसोड



केजच्या नगराध्यक्षपदी जनविकास परिवर्तन आघाडीच्या सिताबाई बनसोड व शितल पशुपतीनाथ दांगट यांची उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. केजमध्ये काँग्रेसने जनविकास परिवर्तन आघाडीशी युती करून सत्ता हस्तगत केली आहे.


# पेडणे, म्हापशात आवाज शिवसेनेचा

## गोवा विधानसभेत खाते उघडण्याची शक्यता

प्रतिनिधी

पणजी : सोमवारी १४ फेब्रुवारी रोजी गोवा विधानसभा निवडणुकीसाठी मतदान झाले. या निवडणुकीत शिवसेनेने दमदार कामगिरी केली. म्हपसा मतदारसंघातून शिवसेनेचे राज्यप्रमुख जितेंद्र कामत आणि पेडणे मतदारसंघातून सुभाष केरकर विजयी होतील, असे मतदारांमध्ये बोलले जात आहे.

नवीन पक्षामध्ये सगळ्यात पुढे शिवसेना आणि आम आदमी पक्ष होते. आम आदमी पक्ष लढला खूप जोशात पण आणि मतदान ही चांगलच घेणार पण आमदार मात्र निवडुन येण्याची शक्यता कमीच आहे. पन काँग्रेसचे मतदान नक्कीच कमी केले आहे. पण मात्र





शिवसेनेचे या वेळेस खात उघडणार असे सांगण्यात येत आहेत कारण पेडणे आणि म्हापसा मध्ये शिवसेना आपले उमेदवारला निवडुन आणण्यास यशस्वी होईल असे सांगण्यात येत आहे. कारण पेडणे हा सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सीमेला लागून आहे. आणि कोकणी मतदार मोठ्या प्रमाणात आहे. आणि आदित्य ठाकरे यांच्या सभेनंतर वातावरण हे शिवसेना मय झाल्याची चर्चा होत आहे. आणि म्हापसा मतदारसंघात तर शिवसेनेचे गोवा राज्यप्रमुख जितेश कामत हे जोरदार लढत देत आहे आणि शेवटच्या दिवसात आदित्य ठाकरे यांनी या मतदारसंघात जोरदार रोड शो केल्याने ह्या मतदारसंघात सुद्धा शिवसेनेचे उमेदवार निवडून येण्याची शक्यता आहे. दरम्यान, आपला विजय निश्चित असल्याची प्रतिक्रिया उमेदवार जितेश कामत आणि सुभाष केरकर यांनी दिली.

# ...तर धनंजय मुंडे जेलमध्ये असते

## करूणा शर्मा यांचे खळबळजनक विधान

प्रतिनिधी

कोल्हापूर : ठाकरे सरकारने संजय राठोड यांच्यावर कारवाई केली. मात्र मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर नाही. जर मुंडेंवर योग्य कारवाई केली असती तर ते आज जेलमध्ये असते, असे खळबळजनक व्यक्तव्य करूणा शर्मा यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना कोल्हापुर येथे केले.

करूणा शर्मा यांनी आता निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याची घोषणा केली आहे. सोमवारी कोल्हापुरात बोलताना करूणा शर्मा यांनी आपला शिवशक्ती पक्ष आता कोल्हापूर उत्तर मतदार संघाची पोटनिवडणूक लढणवार असल्याचं जाहीर केले. तसेच लोकसभा, विधानसभा ते नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पोटनिवडणुका अशा सर्व प्रकारच्या निवडणुकांमध्ये पक्षाचे उमेदवार असतील असंही त्यांनी यावेळी सांगितले. अपेक्षित उमेदवार न मिळाल्यास स्वत: निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे करूणा शर्मानी म्हटले आहे. यावेळी त्यांनी पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांच्यावरही निशाणा साधला आहे.





जिथे जिथे पोटनिवडणूक असेल तिथे आमच्या पक्षाचा उमेदवार उभा करू. कोल्हापूरमध्ये दोन–तीन लोकांशी आमचे बोलणे सुरू असून यामध्ये उत्तम कागले, अजय देढे या सामाजिक कार्यकर्त्याबरोबरच इतर दोन जण राजकीय व्यक्तींचा समावेश आहे. त्यांच्या नावाची घोषणा नंतर करण्यात येईल, अशी माहिती करूणा शर्मा यांनी दिली. शक्ती कायद्यानुसार मुख्यमंत्री उद्धव ठाकरे किंवा महाराष्ट्र सरकारने जर काही केले असते तर सर्वात आधी धनंजय मुंडेंना तुरूंगात टाकले असते. त्यानंतर संजय राठोड यांना तुरूंगात टाकले असते. पण या लोकांवर साधा एफआयआर देखिल पोलिसांनी दाखल केलेला नाही, अशी टीका करूणा शर्मा यांनी केली.

# 'लोकसेवा'च्या शिष्टमंडळाने घेतली पवार यांची भेट

प्रतिनिधी

नवी दिल्ली : सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात कार्य असलेल्या लोकसेवा बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या शिष्टमंडळाने नवी दिल्ली येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा खासदार शरद पवार यांची भेट घेतली. दरम्यान, यावेळी शिष्टमंडळाने विविध विकासात्मक बाबींवर चर्चा केली.

लोकसेवा बहुद्देशीय सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी यांनी खासदार शरद पवार यांची मंगळवार, दि.८ फेब्रुवारी रोजी नवी दिल्ली येथील ६ जनपथ निवासस्थानी भेट घेऊन सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विषयावर चर्चा केली. यावेळी खासदार पवार यांनी उद्योग, व्यवसाय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याविषयी आस्थेवाईकपणे माहिती



घेऊन उपस्थितांची मने जिंकली. गंगाधर वानोळे यांनी पवार यांच्या कराड येथील जुन्या आठवणी सांगितल्या.

यावेळी लोकसभेतील गटनेत्या खासदार सुप्रियाताई सुळे, लोकसेवा संस्थेचे सचिव गंगाधर वानोळे, आदिवासी नेते जयवंत वानोळे ( नांदेड), यचंद्र सयाम (अमरावती), गंगाराम जांभेकर (मेळघाट), विजय घोडे (वाशिम), सुरज आत्राम (वर्धा), राहुल युवनाते (आर्वी), रामदास राठोड ( किनवट) उपस्थित होते.

## 'जय महेश'मधील भुशाला आग

प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील पवारवाडी येथे जय महेश शुगर्सच्या बगॅस डेपोला रविवारी दुपारी अचानक आग लागली. या आगीत ५ हजार मेट्रीक टन बगॅस जळुन खाक झाला.या आगीमुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही.

पवारवाडी येथे खाजगी तत्त्वावर चालू असलेल्या जय महेश शुगर्स या साखर कारखान्यातील बगॅस डेपोला रविवारी दुपारी १२ वाजता अचानक आग लागली. या आगीमुळे परिसरात धुरच धुर पसरला होता.या आगीत ५ हजार मेट्रीक टन बगॅस जळुन खाक झाला. यामुळे कारखान्याचे ५० लाखांचे नुकसान झाले असल्याची माहिती या कारखान्याचे उपाध्यक्ष गिरीष लोखंडे यांनी दिली. ही आग कशामुळे लागली याची माहिती मिळू शकली नाही.



# मंगलताई सोळंके यांना मातृशोक

प्रतिनिधी

पुणे : बीड जिल्हा परिषदेच्य सदस्या मंगलाताई प्रकाश सोळंके यांच्या यांच्या मातोश्री शकुंतलाबाई शिवाजीराव घुले पाटील रा.मांजरी (बु.) ता.हवेली जि.पुणे यांचे वयाच्या ८५ वर्षी सोमवारी अल्पशा आजाराने पुणे येथे निधन झाले आहे. सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, चार मुली, जावई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. माजी मंत्री तथा माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या त्या सासू होत. घुले पाटील कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.

# हिरव्या 'सह्याद्री देवराई'ला नतद्रष्टांची नजर

## आगीत हजारो झाडे जळून खाक;वनविभागाकडून तपास सुरु

प्रतिनिधी

बीड : सिनेअभिनेते निसर्गप्रेमी सयाजी शिंदे यांच्या कल्पनेतून उभ्या राहिलेल्या बीडमधील सह्याद्री देवराईला भीषण आग लागली. या आगीत जवळपास दोन एकरावरील ५०० झाड जळून खाक झाली आहेत. मात्र या आगीबद्दल वेगळाच संशय व्यक्त होतोय. आग लागली नसून लावल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

सह्याद्री देवराईला आग लागल्याने जवळपास दोन एकरचा परिसर जळाला असून यामुळे पाचशेच्या आसपास वड, लिंबू, पिंपळ आदी झाड जळून खाक झाले आहेत. दरम्यान या झाडाविषयी




सह्याद्री देवराईसाठी काम करणाऱ्या, सामाजिक कार्यकर्त्यासह वृक्षप्रेमींनी संवेदना व्यक्त करत, ज्याने कोणी हे केले आहे, त्याच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे. अभिनेते सयाजी शिंदे यांनी गेल्या चार वर्षापूर्वी १४ फेब्रुवारी या दिवशी, बीड पासून काही अंतरावर सह्याद्री देवराईची जोपासना केली होती. आज हेच सह्याद्री देवराई एक पर्यटन केंद्र बनत चालले आहे. शनिवार आणि रविवार या दोन दिवशी या ठिकाणी पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी देखील जमते. कारण जगातले पहिले वृक्ष संमेलन याच सह्याद्री देवराई मध्ये झाले होते. दरम्यान, बीड जिल्ह्यात पडत असणारा सततचा दुष्काळ, कुठे तरी दूर व्हावा आणि जिल्ह्यात पर्यटन केंद्र बनावे, या उद्देशाने अभिनेते सयाजी शिंदे यांनी ही सह्याद्री देवराईची स्थापना केली होती. मात्र काही वाईट विकृतीच्या लोकांकडून कुठंतरी अडथळा आणण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे बोलले जात आहे.



# बीड रेल्वे मार्गासह विकासाला गती देणार

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही; शंभर कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन

▶ प्रतिनिधी



बीड : राज्य सरकारच्या दोन वर्षाच्या कालावधीत आलेल्या कोरोना संकटामध्ये देखील राज्याचा विकासाचा गाडा थांबला नाही आणि थांबणार नाही याची काळजी घेतली गेली. निधीची चणचण असूनही आरोग्य, रूग्णालय आणि विकास कामांसाठी निधी उपलब्ध केला आहे. विकास कामांसाठी येणारा पैसा हा जनतेचा असून यामधून होणारी कामे दर्जेदारच असली पाहिजेत यासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी बारकाईने काळजीपूर्वक लक्ष द्यावे असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी केले.

बीड येथे १०० कोटी ६० लाख रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन व पूर्ण झालेल्या कामांचे लोकार्पण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते बीड येथे झाले. उपमुख्यमंत्री पवार हे मुंबई येथून ऑनलाइन पद्धतीने कार्यक्रमात सहभागी झाले. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या आग्रही मागणीनुसार जिल्हा वार्षिक योजना, विकासाच्या अन्य योजना, आमदार निधी आदींमध्ये कोणतीही कपात केली नाही. बीड जिल्ह्याच्या विकासाचा विचार करता, डीपीडीसी मधून ३६० कोटी रुपयास नुकतीच मंजुरी दिली, ऊसतोड मजुरांसाठी महामंडळ व त्यास २० कोटी भागभांडवल साठी तरतूद, वसतीग्रहासाठी निधीची तरतूद, नगर बीड परळी रेल्वे मार्गासाठी राज्य शासनाचा हिश्शाचा निम्मा निधी उपलब्ध करून दिला गेला आहे. जिल्ह्यातील विविध तीर्थक्षेत्रांत साठी विकास निधी आरोग्य सुविधा निर्माण करण्यासाठी मोदक मोठ्या प्रमाणात तरतूद असा विविध योजनातून विकास निधी दिला गेला आहे. केंद्र सरकार सारखे राज्यांना नोटा छापायला अधिकार नसल्याने राज्याच्या उत्पन्नातून हा निधी दिला जातो. बीड शहरासाठी अमृत योजनेतून दोन पंपिंग स्टेशन कार्यान्वित झाल्यास पाण्याचे प्रश्न सुटू शकेल परंतु नगरपरिषदेचे वीज बिल थकीत आहे. आर्थिक शिस्त देखील लागण्याची गरज आहे यावर उपाय काढण्यासाठी प्रशासक आणि बीडचे आमदार यांना सूचना केली आहे. कोरोना बरोबरच नैसर्गिक आपत्ती साठी निधी दिला गेला आहे. जगात काही ठिकाणी कोरोना साथीची चौथी लाट देखील आली आहे . त्यामुळे आपण गाफील न राहता लसीकरण केले जावे बूस्टर डोस व विद्यार्थ्यांचे लसीकरणा मध्ये पुढाकार घ्यावा असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रशासकीय यंत्रणा व उपस्थितांना केले.

या कार्यक्रमासाठी मुंबई मंत्रालयातून राज्याचे ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, आरोग्यमंत्री राजेश टोपे, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री दत्ता भरणे, आमदार विक्रम काळे हे ऑनलाइन पद्धतीने सहभागी झाले होते. तसेच बीड येथे जिल्हा रुग्णालय परिसरात प्रत्यक्ष कार्यक्रम स्थळी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे, आमदार संदीप क्षीरसागर, आमदार संजय दौंड , जिल्हा परिषद अध्यक्षा शिवकन्या शिरसाट, जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा , मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार, जिल्हा पोलीस अधीक्षक आर.राजा, पंचायत समितीच्या सभापती सारिका गवते, माजी आमदार अमरसिंह पंडित, माजी आमदार सुनील धांडे, माजी आमदार सय्यद सलीम, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुरेश साबळे, पंचायत समितीचे पदाधिकारी, विविध यंत्रणातील अधिकारी कर्मचारी नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस भारतरत्न लता मंगेशकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली, तसेच सर्व विकासकामांचे एकाच ठिकाणी प्रातिनिधिक स्वरूपात औपचारिक भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उदय गिरी यांनी केले तर माजी आमदार सुनिल धांडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



### बीड जिल्ह्याला झुकते माप द्या : पालकमंत्री धनंजय मुंडे

बीड जिल्हा हा मागासलेला म्हणून ओळखला जातो, हे मागासलेपण दूर करण्यासाठी रखडलेल्या नगर बीड परळी रेल्वे मार्गासह, ऊसतोड कामगारांची आर्थिक उन्नती, शेतीला मुबलक पाणी, ग्रामीण भागातील दळण वळण अशी अनेक विधायक कामे पूर्ण करण्याचा राज्य सरकारच्या माध्यमातून आमचा प्रयत्न आहे. बीड जिल्हा पुणे जिल्ह्या प्रमाणे विकसित व्हावा हे आपले स्वप्न असून, यासाठी अर्थमंत्री या नात्याने आपण जिल्ह्याला निधी देताना ओंजळ मोठी करावी व जिल्ह्याला झुकते माप द्यावे, अशी विनंती पुढे बोलताना मंत्री धनंजय मुंडे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना केली. यावेळी पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी मागील दोन वर्षात बीड जिल्ह्यात आरोग्य यंत्रणेतील कामकाज, कोविड व्यवस्थापन व जिल्ह्यात करण्यात आलेल्या विकासकामांची संक्षिप्त माहिती दिली.

### अमृत पेयजल योजनेचे काम गतीने व्हावे:आमदार क्षीरसागर

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आ. संदीप क्षीरसागर यांनी केले; बीड मधील आजच्या विकासकामांची माहिती देत त्यांनी बीड शहर व भागातील विविध मागण्या सर्व मंत्री महोदयांसमोर मांडल्या तसेच आज भूमिपूजन झालेली कामे पूर्ण झाल्यानंतर अजित पवार यांनी या कामांच्या लोकार्पण सोहळ्यासाठी प्रत्यक्ष बीडला यावे अशी विनंती केली. बीड शहरात सुरू असलेलता अमृत पेय जल योजनेतून ९० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी प्रशासक व प्रशासनाने सहकार्य करून समन्वय साधावा असे साकडे आ. संदीप क्षीरसागर यांनी अजितदादा पवार यांना घातले.



## 'गोमंत प्रतीक'मधून गोव्याच्या शाश्वत सौंदर्याला प्राधान्य

### संघमित्रा अर्बनचे सुभाष घनघाव यांचे गौरवोद्गार

▶ प्रतिनिधी

माजलगाव : ऐरवी गोवा म्हटले की बीच, बार आणि पब संस्कृती दाखवून गोव्याचे अतिरंजित चित्र दाखविले जाते. मात्र गोमंत प्रतीक दिनदर्शिकेच्या माध्यमातून गोव्याचे शाश्वत सौंदर्य प्रकर्षाने पुढे आणले आहे, असे गौरवोद्गार संघमित्रा अर्बनचे अध्यक्ष सुभाष घनघाव यांनी काढले. ते प्रतीक देशमाने फाऊंडेशनने काढलेल्या दिनदर्शिकेच्या प्रकाशन प्रसंगी बोलत होते.

गेल्या तीन वर्षापासून फाऊंडेशनतर्फे गोमंत प्रतीक नावाची दिनदर्शिका प्रकाशित करून गोव्याच्या शाश्वत निसर्ग सौंदर्याला प्राधान्यक्रम दिला जातो. यंदाही गोमंत प्रतीक दिनदर्शिका प्रसिद्ध केली आहे. गोमंत प्रतीकच्या मुखपृष्ठावर गोवा आणि कर्नाटक सीमेवर असलेल्या जगप्रसिद्ध दूधसागर धबधब्याचे विहंगम चित्र घेतले आहे. सुमारे १०१७ फुटांचा दूधसागर धबधबा आहे. भारतातील सर्वाधिक उंच धबधबा असलेल्या दूधसागरचे छायाचित्र दिनदर्शिकेच्या मुखपृष्ठावर घेतल्याने गोव्याच्या शाश्वत निसर्ग सौंदर्याला प्राधान्य दिले आहे. गोमंत प्रतीक दिनदर्शिकेचे संघमित्रा अर्बनचे अध्यक्ष सुभाष घनघाव यांनी कौतुक केले. याप्रसंगी प्रतीक देशमाने फाऊंडेशनचे सचिव तथा पत्रकार बाबा श्रीहरी देशमाने, भगीरथ तोडकरी, संदीप सावंत यांची उपस्थिती होती.



## विश्वकर्मा समाजातर्फे मिरवणूक

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहरात लगत असलेल्या नवीन वसाहत भाटवडगाव येथील संत ज्ञानेश्वर नगर येथे विश्वकर्मा सुतार समाजाच्या वतीने विश्वकर्मा व विठ्ठल रूक्मीणी मुर्तींची मिरवणूकीची सुरूवात शनिवार, दि.१२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता आमदार प्रकाश सोळंके यांच्या शुभहस्ते श्रीफळ फोडून करण्यात आली.

या वेळी शिवसेना जिल्हाप्रमुख आप्पासाहेब जाधव, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येवले, डॉ.उध्दवराव नाईकनवरे, ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाणे, नगरसेवक राहुल लंगडे, रोहन घाडगे, ह.भ.प.शिवाजी महाराज गडदे, कालिदास महाराज नाईकनवरे, रामराजे सोळंके, अमोल डाके, दासू पाटील बादाडे, बाळासाहेब मेंडके, आदी उपस्थित होते. आणि रविवार, दि.१३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता कलशारोहन व प्रभू विश्वकर्मा व विठ्ठल रूक्मीणी मुर्ती प्राणप्रतिष्ठा ह.भ.प.पु.ब्र.तुकाराम महाराज शास्त्री यांच्या शुभहस्ते आणि ह.भ.प. शिवाजी महाराज गडदे, ह.भ.प. कालिदास महाराज नाईकनवरे यांच्या उपस्थित करण्यात येणार आहे. आणि सोमवार, दि.१४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते १ ह.भ.प. विनोदाचार्य पांडुरंग महाराज उगले यांचे काल्याचे किर्तन झाले. त्यानंतर महाप्रसाद झाला. तरी भाविक भक्तांनी लाभ घेतला. या कार्यक्रमाचे आयोजन विश्वकर्मा समाज बांधवाच्या वतीने करण्यात आले.

## स्वरसंगम कलावंत संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी उत्तम गायकवाड

▶ प्रतिनिधी

माजलगाव : संगीत क्षेत्रात नावाजलेल्या स्वरसंगम कलावंत संघटनेच्या माजलगाव तालुकाध्यक्षपदी येथील उत्तम गायकवाड यांची तर उपाध्यक्षपदी रवि भरीत यांची एक मुखाने निवड करण्यात आली



स्वरसंगम कलावंत संघटना महाराष्ट्राचे संस्थापक अध्यक्ष विजय वाघमारे यांनी दि.१२ फेब्रुवारी रोजी माजलगाव येथे व्यापक बैठक घेऊन या संघटनेचा विस्तार व्हावा या उद्देशाने माजलगाव तालुका पदाधिकारी यांची निवड करण्यात आली. यात स्वरसंगम कलावंत संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी गायन आणि संगीताची आवड असणारे उत्तम गायवाड यांची अध्यक्षपदी, उपाध्यक्षपदी रवि भरीत तर दत्तात्रय व्यवहारे यांची सचिवपदी अविरोध निवड केली सर सदशय म्हणून तौफिक कुरेशी, सखाराम ढगे, सुमित साळवे, नंदिनी व्यावहारे, सौरभ सिरसाट, अत्याबा खरात, दत्तात्रय समुंदरे व माने यांची निवड झाली यावेळी संघटनेचे महाराष्ट्र सचिव अंकुश वाटुरे व शाखा अध्यक्ष हरिभाऊ वानखेडे यांची उपस्थिती होती. स्वरसंगम कलावंत संघटना ही विविध सामाजिक व लोकजागृतीपर गीत सादर करून संपूर्ण महाराष्ट्रात आपली कला सादर करून सामाजिक सलोखा निर्माण करण्याचे अविरत कार्य करत असल्याचे विजय वाघमारे यांनी यावेळी बोलताना सांगितले.



## स्वत:चा ब्रँण्ड निर्माण करा : माधव निर्मळ

### प्रसिध्द उद्योजक माधव निर्मळ यांचा सल्ला

▶ प्रतिनिधी



माजलगाव : स्पर्धेच्या या युगात विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्राची निवड करून जीव ओतून काम करावे आणि स्वतःचा ब्रँण्ड निर्माण करावा. असे मत प्रसिद्ध उद्योजक माधव निर्मळ यांनी व्यक्त केले. सकल धनगर समाज, माजलगावच्या वतीने दि.११ फेब्रुवारी, शुक्रवार रोजी सेवानिवृत्त मुख्याध्यापक यांचा सेवापूर्ती सत्कार आणि गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बबनराव सरवदे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून सभापती कल्याण आबुज, तुकाराम येवले, राजू कोमटवार, सुभाषराव गडदे, संपतराव हराळ, डॉ.युवराज कोल्हे, डॉ.भारत वाघमोडे, उपस्थित होते. यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक भगवानराव धरपडे यांचा सेवापूर्ती सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गुणवंत विद्यार्थी पार्थ मंजुळदास गवते (एमबीबीएस), सृष्टी भारतराव वाघमोडे (एमबीबीएस), मयूर भारतराव कोरडे (एमबीबीएस), अजिंक्य लक्ष्मीकांत सोन्नर (एमबीबीएस), उत्कर्ष बाळासाहेब सोनसळे (बीटीएस टॉपर), हर्षवर्धन ज्ञानेश्वर गवते (५ वी शिष्यवृत्ती धारक), संयम ज्ञानेश्वर गवते (८वी शिष्यवृत्ती धारक)यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.लक्ष्मीकांत सोन्नर यांनी केले.

## उज्वल भवितव्यासाठी सुसंस्कारित पिढी निर्माण व्हावी : अशोक वाडेकर

▶ प्रतिनिधी



माजलगाव : विद्यार्थ्यांच्या अंगी ज्ञान तृष्णा, गुरुनिष्ठा, सदा अध्ययन दक्षता, एकाग्रता आणि महत्त्वेच्छा हे पाच गुण असणे आवश्यक आहे. या पाच गुणांची जो विद्यार्थी जोपासना करतो आणि जीवनात मार्गक्रमण करतो तो यशस्वी झाल्याशिवाय राहत नाही. या गुणा बरोबरच विद्यार्थ्यामध्ये संस्कार असणे हेही महत्त्वाचे आहे. भारताच्या उज्वल भविष्यासाठी सुसंस्कारित पिढी निर्माण होणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नागडगाव चे मुख्याध्यापक तथा प्रसिद्ध व्याख्याते अशोक वाडेकर यांनी व्यक्त केले.



केसापुरी कॅम्प येथील आयटीआय कॉलेजच्या वतीने मंगळवार, दि.८ फेब्रुवारी रोजी विद्यार्थी, त्यांचे कुटुंब, समाज आणि शैक्षणिक संस्था यांचा सहसंबंध या विषयावर त्यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयटीआय कॉलेजचे प्राचार्य एस.एम.राठोड हे होते. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून आर्ट ऑफ लिव्हिंगचे मराठवाडा समन्वयक शरद डोल्हारकर, आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक नंदकुमार शिंदे ,गणेश घाटुळ यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना अशोक वाडेकर म्हणाले, शिक्षणाने माणूस परिपूर्ण होऊ शकतो. यासाठी विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन आपल्या कुटुंबाची समाजाची, पर्यायाने देशाची सेवा करावी. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो व्यक्ती ते दूध प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. थोर महापुरूष होऊन गेले. चरित्र त्यांचे पहा जरा! त्यांच्या सम आपण व्हावे हाची सापडे बोध खरा!! याप्रमाणे महामानवांचा इतिहास आपण वाचला पाहिजे आणि त्यांच्या प्रमाणे आपण मार्गक्रमण करणे आवश्यक आहे .आई वडील ही विद्यार्थ्यांचा पहिला गुरु असतो. तेव्हा कुटुंबामध्ये जे संस्कार विद्यार्थ्यावर होतात ते चिरकाल टिकून राहात असतात म्हणून आई-वडिलांनी विद्यार्थ्यांना सुसंस्कारित करणे गरजेचे आहे. शाळा हे संस्कार केंद्र आहे. यामध्ये गुरू विद्यार्थ्यांना संस्कार देतात आणि विद्यार्थी त्यांचे भविष्य घडवतात. तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार याप्रमाणे प्रत्येक विद्यार्थी हा स्वतःच्या जीवनाचा शिल्पकार असतो. आपण आपल्या जीवनात ध्येय निश्चित केले पाहिजे आणि ते ध्येय गाठण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्टा केली पाहिजे. केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे याप्रमाणे आपण अभ्यास करणे गरजेचे आहे. आपल्या आई-वडिलांना वृद्धाश्रमात पाठवण्याची वेळ मुलांनी कधीही आणू नये अशी विनंती अशोक वाडेकर यांनी यावेळी केली. यावेळी वाडेकर यांनी विविध कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ए एम कांबळे यांनी केले तर आभार एन.पी.तायडे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी आयटीआय मधील एन.पी.पटवी, बी.बी.टउळ, डी.आर. खरटमल, ए.पी.राठोड, देशमुख मॅडम, तौर, इंगोले सह विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## वंचितच्या जिल्हा अध्यक्षपदी कांबळे

▶ प्रतिनिधी



परळी : वंचित बहुजन आघाडीच्या (पूर्व) जिल्हाध्यक्षपदी शैलेश कांबळे यांची निवड , कार्यकारणीची सविस्तर माहिती अशी की, ॲड.प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली व प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर, मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा कार्यकारिणीच्या निवडी जाहीर करण्यात आली असून यात अंबाजोगाई, केज, परळी, धारूर, या पूर्व विभागासाठी निवड करण्यात आली आहे.

अंबाजोगाई येथील एकनिष्ठ कार्यकर्ते शैलेश कांबळे यांची बीड जिल्हाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. तर उर्वरित कार्यकारिणीत महासचिव मिलिंद घाडगे, उपाध्यक्ष अण्णासाहेब म्हस्के, सचिन उजगरे, उपाध्यक्ष बाबुराव मस्के, उपाध्यक्ष मिलिंद गायकवाड, धनराज सोनवणे, उपाध्यक्ष सुरेश बचुरे उपाध्यक्ष प्रसेनजित रोडे, उपाध्यक्ष गौतम आगळे यांची निवड करण्यात आली.

## अपघातात दत्ता भंडारे यांचा करूण अंत

▶ प्रतिनिधी



माजलगाव : ट्रक मागे घेताना चाकाखाली अडकून एका तरूणाला जीव गमवावा लागला. १० फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजेच्या सुमारास शहरालगतच्या गढी रोडवरील एका वजन काट्यासमोर ही घटना घडली. माजलगाव बायपास रोड वरील साई मंदिराचे पुजारी तथा राष्ट्रीय महामार्गावरच्या मुंदडा आईल मिल येथील कामगार दत्ता शिवकुमार भंडारे (वय ३२ वर्षे), रा.गजानन नगर, माजलगाव असे मयताचे नाव आहे. याबाबत पोलीस नाईक माधव तोटेवाड यांनी फिर्याद दिली. ट्रक चालक रामा किसन चौगुले हा वजन काट्यासमोर ट्रक (एमएच २४ एबी.८६२७) पाठीमागे घेत होता. यावेळी दत्ता भंडारे यास धडक बसून त्याचा मृत्यू झाला. भंडारे यांच्या परिवारावर कोसळलेल्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.



# शिवसेना स्टाईल आंदोलनापुढे 'जय महेश'ने नांगी टाकली

प्रतिनिधी

माजलगाव : येथील जय महेश साखर कारखान्यात कार्यक्षेत्राबाहेरील गेटकेन पद्धतीने मोठ्या प्रमाणात ऊस गाळपासाठी आणण्यात येत आहे. त्यामुळे कारखाना परिसरातील ऊस गाळपाअभावी उभा आहे. त्यामुळे गेटकेन बंद करून परिसरातील ऊस तात्काळ गाळपास न्यावा, या मागणीसाठी गुरूवारी शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख आप्पासाहेब जाधव यांच्या नेतृत्वाखाली कारखान्यावर आंदोलन करण्यात आले.



गुरूवारी सकाळी शिवसैनिक आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी कारखान्याच्या मुख्य प्रवेशद्वारास कुलूप लावून प्रवेशद्वारासमोर प्रचंड घोषणाबाजी केली. अखेर पाच तासांनी कारखाना प्रशासन झुकले आणि शिवसेना जिल्हाप्रमुख आप्पासाहेब जाधव यांना कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील सर्व ऊसतोड करणाऱ्या मजुरांच्या टोळ्या येत्या दोन दिवसांत कारखान्याच्या परिसरात आणण्यात येतील, असे लेखी आश्वासन कारखाना उपाध्यक्ष गिरीश लोखंडे यांनी दिले. या आंदोलनात उपजिल्हाप्रमुख रामराजे सोळंके, जिल्हा संघटक रामदास ढगे, केज तालुकाप्रमुख रत्नाकर शिंदे, धारूर तालुकाप्रमुख नारायण कुरूंद, वडवणी तालुकाप्रमुख संदीप माने, माजलगाव उपतालुकाप्रमुख नामदेव सोजे पाटील, अतुल उगले, अमोल डाके, सिरसाळा शहरप्रमुख कैलास कावरे, प्रभाकर धरपडे, शेख आयाज, कल्याण बल्लाळे, सुखदेव धुमाळ, महादेव वैराळे, कल्याण मोहिते, दादा मोहिते, नारायण तौर, प्रल्हाद घाटुळ, कामराज डाके, अनवरभाई, मुंजाबा जाधव, प्रदीप तांबे, अभिजीत देडे, अनिल ढगे, युवासेनेचे उपजिल्हाधिकारी राहुल सुरवसे, तालुका अधिकारी महेश थेटे, शहरप्रमुख विशाल थावरे, पी.आर.पी.चे सिद्धार्थ ससाणे व ऊसउत्पादक शेतकरी उपस्थित होते.

## जिल्हा रूग्णालयात गप्पी माशांचे संवर्धन



बीड : येथील जिल्हा रूग्णालय परिसरात गप्पी माशांचे संवर्धन केले जात आहे. याबाबत प्रत्यक्ष पाहणी करताना जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुरेश साबळे आणि कर्मचारी.

# वैष्णवी बजाज सी.ए. परिक्षेत उत्तीर्ण

प्रतिनिधी




माजलगाव : शहरातील प्रतिष्ठित व्यापारी रवीप्रसाद बजाज यांची मुलगी तर प्रगतशील शेतकरी गुलाब बजाज यांची पुतणी वैष्णवी ही यावर्षी घेण्यात आलेल्या सी.ए.परिक्षेत उत्तीर्ण झाली आहे तीचे सर्वस्तरातुन अभिनंदन होत आहे.

इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडियाने डिसेंबर २०२१ मध्ये घेतलेल्या परिक्षेचा निकाल गुरूवार, दि.१० फेब्रुवारी रोजी लागला त्यात वैष्णवी चांगल्या गुणवतेने पास झाली. तीचे शालेय शिक्षण सिंदफणा इंग्लिश स्कूलमध्ये तर महाविद्यालयीन शिक्षण पुणे येथे घेतले. तीच्या या यशाबद्दल आमदार प्रकाश सोळंके, सौ.मंगलताई सोळंके, मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक, रमेश आडसकर, आदिंना अभिनंदन केले.

# धारूर तालुक्यातील १०० विहिरींचा शेतकऱ्यांना लाभ

## आमदार प्रकाश सोळंके, जयसिंह सोळंके यांच्या प्रयत्नांना यश





प्रतिनिधी

धारूर : माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे भाग्यविधाते आमदार प्रकाश सोळंके विकासाला गती देणारे नेतृत्व असून, त्यांच्या प्रयत्नाने धारूर तालुक्यातील १०० शेतकऱ्यांना विहिरींचा लाभ मिळाला आहे. ७७ विहीरींचे काम पण चालू झाले आहे. उर्वरीत विहीरचे काम लवकरच चालू होतील. यामुळे शेतकऱ्यांतुन आमदार सोळंके यांचे आभार व्यक्त केले आहेत.

धारूर तालुक्यात नुकत्याच एम.आर.ई.जी.एस. योजनेतुन तालुक्यात १०० विहिरींना मंजुरी मिळाली आहे. सदर विहीरींचा लाभ शेतकऱ्यांना वैयक्तिक पातळीवर झाला असुन, तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांना याचा लाभ मिळावा म्हणून आमदार प्रकाश सोळंके व सभापती जयसिंह सोळंके हे प्रथम पासुनच प्रयत्नशील होते. धारूर तालुका बहुतांश डोंगराळ भाग असून, तालुक्यातील शेतकऱ्यांना नैसर्गिक पावसाच्या पाण्यावर पिके घेता येत नव्हती .तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी ओलिताखाली याव्यात त्यांना स्वतःच्या हक्काच्या पाण्यावर शेतात पिके घेता यावेत. म्हणून आमदार सोळंके यांनी या विहीरींना धारूर तालुक्यात जास्तीत जास्त मंजुरी मिळावी म्हणून प्रयत्नशील होते. त्यांच्या प्रयत्नाला यश मिळुन तब्बल १०० विहिरींना मंजुरी मिळाली आहे. तालुक्यातील ज्या गावातील शेतकऱ्यांना विहीरी मिळाल्या आहेत. त्यांच्या विहीरींचे खोदकाम ही नुकतेच चालु झाले असुन, यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्य दिसुन येत असुन, ते आ.सोळंके व सभापती सोळंके यांचे मनोमन आभार व्यक्त करत आहेत. धारूर तालुक्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात विहीरींना मंजुरी मिळण्याची ही पहिलीच वेळ असुन, आता तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वैयक्तिक शेत जमिनी सिंचनाखाली येऊन, शेतकरी आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्यास मदत होणार आहे. याचे सर्वस्वी श्रेय हे आमदार प्रकाश सोळंके, बीड जिल्हा परिषदेचे सभापती जयसिंह सोळंके यांचेच आहे.

### मतदारसंघात विकास सुपरफास्ट : भागवत दराडे



माजलगाव विधानसभा मतदारसंघाच्या विकासाला गती देण्यासाठी आमदार प्रकाश सोळंके, सभापती जयसिंह सोळंके यांचे सतत प्रयत्न असतात. विकास कामात कधीही राजकारणाचा आडपडदा येऊ न देता विकास कामे करण्यावर त्यांचा भर असतो. हे वेळोवेळी दिसुन येते. सोळंके चुलत्या पुतण्यांमुळे धारूर तालुक्यातील तब्बल शंभर शेतकऱ्यांना विहिरींचा लाभ मिळाला. हे तालुक्यासाठी गौरवाची व अभिमानाची बाब आहे. या विहिरी मंजूर करण्यासाठी त्यांनी शासन पातळीवर प्रयत्नांची पराकाष्ठा करून तब्बल शंभर विहिरी खेचुन आणल्या. यासह इतरही विकास कामांसाठी सोळंके परिवार नेहमीच अग्रेसर असल्याचे वेळोवेळी दिसतच असतं, आमदार दादा व भैय्या हे विकासाला गती देणारे नेतृत्व असून, त्यांच्यामुळे बारामतीच्या धर्तीवर माजलगाव मतदारसंघात विकास होणार यात शंकाच नसल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस भागवत दराडे यांनी व्यक्त केली. आमदार प्रकाश सोळंके, बीड जिल्हा परिषदेचे सभापती जयसिंह सोळंके यांच्यामुळे माजलगाव मतदारसंघात आता खऱ्या अर्थाने विकासाला गती मिळत असल्याचे प्रतिपादनही युवा नेते भागवत दराडे यांनी व्यक्त केले.

# 'जयमहेश'चे कार्यालय चिंचगव्हाण येथे सुरू ठेवा : योगेश उगले

प्रतिनिधी



माजलगाव : शहरालगत मुख्य रस्त्यावर असलेल्या चिंचगव्हाण येथील जयमहेश साखर कारखान्याचे कार्यालय मागच्या काही दिवसांनी बंद असल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अनेक अडचणीस तोंड द्यावे लागत असल्याने ते सुरू ठेवावे, अशी मागणी माजलगाव युवासेनेचे तालुका समन्वय योगेश उगले यांनी प्रसिद्दी पत्रकातून केली आहे.

जय महेश कारखान्याने शेतकऱ्यांना कारखान्यावर येऊन आपला वेळ खर्च करावा लागत असल्याने या कारखान्याने सुरूवातीपासून शहरापासून अगदी जवळ व राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या चिंचगव्हाण येथे आपले एक कार्यालय सुरू केले आहे. या ठिकाणी कारखान्याचे सर्व कामे केली जातात. त्यामुळे शेतकरी कारखान्यावर जात नाही. मात्र सदरील कार्यालयात हे मागच्या आठ-दहा दिवसांपासून बंद असल्याने शेतकऱ्यांना ऊसनोंदी, ऊस तोड, बील बाबतच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. वारंवार हे कार्यालय बंद असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी धावपळ थांबावी, आदी समस्यांमुळे या ठिकाणाचे कार्यालय सुरू करावे, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख बीड आप्पासाहेब जाधव यांच्या आदेशावरून माजलगाव युवासेना तालुका समन्वयक योगेश उगले यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केली आहे.

# शिवजन्मोत्सव सण म्हणून साजरा करावा : राम कटारे

प्रतिनिधी



माजलगाव : स्वराज्य संस्थापक रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची येत्या १९ फेब्रुवारी २०२२ रोजी जयंती आहे. कोरोनाचे संकट असल्याने मोठ्या प्रमाणात सार्वजनिक ठिकाणी एकत्र येणे अशक्य आहे. प्रशासनाने दिलेल्या सर्व नियमांचे पालन करून १९ फेब्रुवारी दहादिवशीय शिवजन्मोत्सव घरोघरी सण म्हणून सर्व समाज बांधवांनी साजरा करावा, असे आवाहन ओबीसी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राम कटारे यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे उत्कृष्ट पुस्तके वाचून सर्वांनी त्यांचे आचरण आत्मसात करावे, जगातील पहिला दहादिवशीय शिवजन्मोत्सव पुणे येथे शिवजयंतीचे जनक राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले भव्य दिव्य असा शिवजयंती उत्सव साजरा केला, किल्ले रायगड येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची समाधी १८७९ साली शोधून जगातील पहिली शिवजयंती मोठ्या उत्साहात सर्व समाज बांधवांच्या साथीने सासरी केली. फाल्गुण वद्य तृतीय १५५१ म्हणजे १९ फेब्रुवारी १६३० रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म जुन्नर येथील पुणे याठिकाणी शिवनेरी किल्यावर झाला, वयाच्या १२ व्या वर्षापर्यत आई राजमाता जिजाऊ, वडील छत्रपती शहाजीराजे भोसले यांच्या देखरेखीखाली व नामवंत शिक्षकांकडून शिवरायांना कला, विद्या व सर्वच क्षेत्रात सक्षम केले, पुढे याच थोर शिवबांनी रयतेला स्वताचे स्वराज्य मिळुन दिले अशा थोर, महापराक्रमी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती सर्व समाज बांधवांनी दहादिवशीय शिवजन्मोत्सव घरोघरी सण म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करावा, असे आवाहन ओबीसी संघटन जिल्हा अध्यक्ष राम कटारे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## आमदार सोळंकेंकडून 'वर्तमान'चे कौतुक



तेलगाव : येथील लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या कार्यालयात 'वर्तमान'चे वाचन करताना आमदार प्रकाश सोळंके. दरम्यान, 'वर्तमान'च्या अंकाचे आमदार सोळंके यांनी कौतुक करून वर्तमान टीमला शुभेच्छा दिल्या.

# माजलगावरांचा आवाज गेला; भारत बागडे यांचे निधन

प्रतिनिधी



माजलगाव : येथील चालते बोलते अँडव्हटायझर म्हणून प्रसिद्ध असलेले निवेदक भारत दगडोबा बागडे यांचे गुरूवारी पहाटे निधन झाले. ते तरूण वयापासून शहरात रिक्षा द्वारे डव्हटायझरींगचा व्यवसाय करून लहानथोरात प्रसिध्द होते. गुरूवारी पहाटे ऱ्हदय विकाराचा झटका आला व त्यातच त्यांचे निधन झाले. त्यांच्यावर येथील मंगलनाथ स्मशान भुमित अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. दरम्यान, माजलगावकरांचा आवाज गेला असल्याची भावना सर्व स्तरातून व्यक्त केली जात आहे. बागडे यांच्या परिवारावर कोसळलेल्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.

## आडसकरांची सदिच्छा भेट



माजलगाव : येथील नामांकित विठ्ठल मोबाईल शॉपीला भाजपा नेते रमेश आडसकर यांनी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी मोबाईल शॉपीचे संचालक विकास पवार, दत्तात्रय सपाटे यांना आडसकर यांचा सन्मान केला.

# माजलगावात 'शर्म करो मोदी' काँगेसचे आंदोलन

प्रतिनिधी



माजलगाव : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यसभेत बोलताना महाराष्ट्र काँग्रेस व काँग्रेस नेत्याबद्दल बेताल व बेजबाबदार वक्तव्य करू संबंध महाराष्ट्रातील जनतेचा अपमान केला त्यामुळे पंतप्रधान मोदी यांच्या निषेधार्थ माजलगाव तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने नारायण होके पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयासमोर 'शर्म करो मोदी माफी मांगो मोदी' आशा जोरदार घोषणाबाजी करत तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी शेख अहेमद, अतिक पठाण, गणेश कोथिंबीर, शेख जानुशा, समियोद्दीन अन्सारी, अंकुश तौर, मुसा शेख, हनुमान होके, राजेश होके, गोविंद होके यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रियांका करवा सी.ए.परिक्षेत उत्तीर्ण

प्रतिनिधी



माजलगाव : तालुक्यातील लवुळ येथील शेतकरी नंदकिशोर बद्रीनारायण करवा यांची मुलगी प्रियांका ही यावर्षी घेण्यात आलेल्या सी.ए.परिक्षेत उत्तीर्ण झाली.सी.ए.परिक्षेचा निकाल गुरूवार रोजी लागला. त्यात प्रियांका करवा चांगल्या गुणवतेने पास झाली. तिचे शालेय शिक्षण माजलगाव येथे महाविद्यालयीन शिक्षण लातूर येथे तर बाकीचे शिक्षण पुणे येथे घेतले. तीच्या या यशाबद्दल जवाहर भक्कड, रामनारायण बजाज, रामचंद्र तोष्णीवाल, पुरूषोत्तम करवा, उमेश मानधने यांनी अभिनंदन केले.

# रखमाजी प्रधान यांचे निधन

प्रतिनिधी



माजलगाव : शहरातील भीमनगर भागातील रहिवाशी रखमाजी काळुराम प्रधान (वय ६२) यांचे रविवार, दि.६ फेब्रुवारी रोजीच्या पहाटे ५:३० वाजता ऱ्हदयविकाराच्या तीव्र धक्क्यामुळे निधन झाले. त्यांच्या पार्थीवावर माजलगाव बायपास रोड जवळच्या सिंदफणा नदीच्या काठावर असलेल्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार विवाहित मुली, एक अविवाहित मुलगा, नातवंडे असा परिवार आहे. अंत्यसंस्काराच्या प्रसंगी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. प्रधान यांच्या परिवाराच्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.




चि.हरिष रमेश तिडके

यास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

:::: शुभेच्छुक ::::

रमेशभाऊ तिडके मित्र मंडळ

चाटगाव, ता.धारूर, जि.बीड



UNLIMITED INCOME, FREE JOINING
NO INVESTMENT - NO RISK
PART-TIME WORK FROM HOME
DREAM CAR FUND
DREAM HOME FUND
FOREIGN TRIPS
PASSIVE INCOME
Let's Join MODICARE
Modicare


आधुनिक विचारांचे वर्तमान

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.